नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 24/06/2023 (शनिवार) दुपार

---

## धापेवाडा येथे आषाढी एकादशी चे दिवशी मुस्लीम बांधवांकडुन कुर्बाणी देणार नाहीत दुसरे दिवशी कुर्बानी मुस्लीम कमिटीचा निर्णय

रोजी १७.१५ वा. ते १९.१५ वाजता पर्यंत पोलीस स्टेशन सावनेर येथे मा. श्री विशाल आनंद पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात श्री रवींद्र मानकर पोलीस निरीक्षक सावनेर यांचे अध्यक्षतेखाली आगामी बकरी ईद व आषाढी एकादशी निमित्त शांतता कमिटी ची बैठक घेण्यात आली बैठकीमध्ये शांतता कमिटी सदस्य मस्जिद प्रमुख व पोलीस पाटील हजर होते मौजा धापेवाडा येथे आषाढी एकादशी निमित्त यात्रा असल्याने गौशिया रिजेविया मस्जिद धापेवाडा येथील अध्यक्ष शब्बीर रेहमान फारुकी यांनी सांगितले की आम्ही विदर्भ च्या पंढरपूर नगरीत धापेवाडा येथे राहत असून आषाढी एकादशीच्या दिवशी सर्वांना उपवास असतो व दुसऱ्या दिवशी सकाळी लोक उपवास सोडतात त्यामुळे आम्ही बकरी ईद च्या दिवशी आषाढी एकादशी असल्याने सर्वांच्या भावनेचा आदर करुन आम्ही आषाढी एकादशीचे दिवशी कुर्बानी देणार नसून दुसऱ्या दिवशी संध्याकाळी कुर्बानी देणार आहे असे म्हटल्याने माननीय पोलीस निरीक्षक साहेब यांनी त्यांचे अभिनंदन केले. बैठकीमध्ये साबीर शेख, दिलावर शेख, रहमुद्दीन सय्यद, कबीर उद्दीन शेख, अश्फाक शेख नितीन गोसावी, सावजी जोगी, शेषराव डोंगरे, विनोद महाजन, विनोद जुनघरे, अखिलेश सिंह गहरवार पोलीस पाटील हेटी असे सदस्य सुद्धा मीटिंगला हजर होते व तसेंच मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांनी धापेवाडा मंदिराला भेट देऊन येणाऱ्या एकादशी निमित्त उत्सवाचे पार्श्वभुमीवर मंदीराची व परिसराची पाहनी केली व ठाणेदार यांना बंदोबस्ताचे मार्गदर्शन करुन सूचना दिल्या.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर